१२६१७

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७६९

# अर्चना



REFBK-0016278
REFBK-0016278

हरीश केमनाईक

४१४६८
काव्य
१०८१
२३।८।६८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४१४६८ वि: काव्य
१०८१ नों दि: २३।८।६८

# अर्चना

REFBK-0016278
REFBK-0016278

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६२७८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

अर्चना

हरीश स. केमनाईक

© अर्चना प्रकाशन, १९६७

प्रकाशिका :
सौ. कुमुद ह. केमनाईक
१०/१३ पहिला पारसीवाडा
व्ही. पी. रोड, मुंबई ४

मुखपृष्ठ :
सत्येन्द्र एम्. शर्मा
दिल्ली

मुद्रक :
कमलाकांत मो. विरकुड
मयूर आर्ट प्रायव्हेट लिमिटेड
शिवशक्ति, वरळी, मुंबई १८

मूल्य रु. २-००

या कवनांची किंमत आहे
दोन उष्ण आंसू ...

परंतु होते सदैव तुमच्या
ओठावर हांसू ...

पूज्य वडिलांच्या
पवित्र स्मृतीस

# म नो ग त . . .

**श्री** शारदेच्या मंदिराचा उंबरा ओलांडतांना
थोडा बावरलो होतो. पण वेळीच
**सौ. शिरीष पै** यांच्या ‘सदिच्छा’
सोबत आल्या..उमेद खूपच बळावली

माझ्या अनेक मित्रांच्या प्रोत्साहनानें
बोबड्या शब्दांत केलेलें हें गुणगान
रसिकानी गोड मानून घ्यावे...

वर्षप्रतिपदा
शके १८८९

— **हरीश केमनाईक**

# स दि च्छा

हरीश केमनाईक ह्यांची कविता मी वाचली आणि कुठल्याही कवीचें जग जसें स्वप्नाळु, हळवें, सुंदरतेनें भारलेलें, व्याकुळ अन् एकाकी असायला हवें तसेंच त्यांचेंहि असल्याची जाणीव मला झाली. त्यांची कविता त्यांच्या स्वप्नांनीं, इच्छांनीं आणि निराशांनीं जशी घडवलेली आहे तशीच ती आधुनिक मराठी काव्यांतले संस्कार घेऊनही निर्माण झाली आहे— आणि तें अपरिहार्य आहे. स्वतःची निर्मिती करतांना प्रत्येक कवि कांहीं आदर्श डोळ्यापुढें ठेवून असतोच. त्यामुळें त्याला आदर्श वाटणाऱ्या कवींचीं प्रतिबिंबें नकळत त्याच्या कवितेंत उमटलेली आढळली तर त्यांत आश्चर्य कांहीं नाहीं. तथापि स्फूर्ति इतरांपासून घेतलेली असली तरी उर्मी मात्र स्वतःच्याच हव्यात. नक्कल निर्जीव असली तरी अनुकरण जिवंत असतें, रसरशीत असतें आणि नवनिर्माणक्षम असते,

'पूजन' ह्या पहिल्याच कवितेंत अतिशय नम्रतेनें ते आपल्या निर्मितीचें मूळ सांगून जातात—

'माधुर्य नाहीं इथें गेयतेचें भारावलेली मनी भावना...' भावना भरून आल्याशिवाय ते कविता लिहीत नाहींत. आणि ज्यांच्या व्यथेनें अश्रू गाळले आहेत त्यांच्यापाशीच आपल्या कवितेला आश्रय लाभेल अशी उमेद त्यांनी ह्या कवितेंतून व्यक्त केली आहे. त्यांची कविता लहान असली तरी भावनेनें ती सर्वत्र ओथंबलेली आहे— तिच्यात शाब्दिक कोरडेपणा नाहीं.

त्यांची प्रेमकविता मला अधिक आवडली. तिच्यांत एक बेदरकार आत्मसमर्पण आहे. प्रेमविषयाशीं उत्कट तन्मयता आहे, ह्या प्रेममय अवस्थेंत साऱ्या निसर्गातही त्यांना आपल्याच मनःस्थितीच्या छाया तरळतांना दिसतात.

**'उगा थबकतो उदास वारा स्पर्शून जातो या माळाला**
**भिरभिरणाऱ्या तांबुस वाटा कुजबुज करिती क्षणाक्षणाला...**
**कधी वडाची दीर्घ जांभई विणीत बसते अपुल्या छाया...**
**हसती पानें सळसळणारी परस्परांची पाहुन माया...'**

किंवा

**'एकलकोंड्या पाणवठ्याला झपाटलेली पिशाच बाधा**
**कुजबुज करते पागल पाणी उभा न राही पिसाट वारा..'**

ह्यासारखी कांहीं सुंदर निसर्गवर्णनें कवितेंतला व्याकुळतेचा आणि एकलेपणाचा भाव जसा चित्ररुप करतात आणि कवीच्या मनःस्थितीचें साक्षात् दर्शन घडवतात.

खऱ्या प्रेमिकाला मीलनापेक्षां विरहांतच अधिक गोडी वाटते आणि विरह हा तर प्रीतीचा शेवट नसून तिचा कळस आहे. हरीश केमनाईक ह्यांच्या कवितेंत ह्या सत्याचा प्रत्यय वारंवार येतो. स्मृतीमुळें दुरावा अधिक सुंदर भासतो. दुराव्यामुळें प्रेमाच्या सच्चेपणाची अधिक खात्री पटते आणि विरहांत चिरंतन मीलनाचाच साक्षात्कार घडतो. त्यांची प्रेम कविता असाच कांहींसा प्रत्यय देऊन जाते.

'विस्मरण' ह्या कवितेत प्रेयसीला आठवण्याची आठवण देतांना ते म्हणतात,

**'विसरूं नको कधि बोल तुझे ते    विसरणार मी नाहि तुला रे !'**
**आठवणींच्या    गर्दीमध्यें    विसरुन जाशिल तेंच नेमकें !'**

'आज निरोप घेतांना' ह्या कवितेंतहि अटळ दूरतेपेक्षां त्यांना भय वाटते आहे ते शपथा वाया जातील ह्याचेच.

तरीपण 'ह्या अमृताच्या घोटासाठीं' आपले प्राण कासावीस व्हावेत हींच आशा ते अंतरी बाळगून आहेत.

शेवटचे अपरिहार्य एकलेपण ते मनांतून जाणून आहेत आणि म्हणूनच ते म्हणतात,

**'दूरच्या प्रस्थान काली    मीच माझा सोबती'**

हरीश केमनाईक ह्यांची कविता आज नुसतीच आत्मनिष्ठ आहे. पण ही सुरुवात आहे. आत्मनिष्ठेमधून ते जेव्हां आत्मदर्शनामध्यें प्रवेश करतील, वर उठणारे तरंग ओलांडून खोल तळापर्यंत ते जसजसे पोचतील, तसतशी त्यांची कविता उघड वर्णनपर न रहाता अधिक गूढ आणि अधिक अर्थवाही होत जाईल अशी आशा त्यांची ही कविता वाचून निश्चित वाटते. भावनांच्या गुंतागुंती मग त्यांना अधिक समर्थपणें सांगता येतील. मग आजची सांकेतिक भाषाहि पालटेल आणि जी केवळ स्वतःची आणि स्वतःतून उद्गारली जाते ती भाषा ते बोलू लागतील. असा विश्वास आज तरी वाटतो ! कारण प्रामाणिक आत्मनिष्ठाच कुठल्याही क्षेत्रांत आत्मदर्शनाला जन्म देत असते – मग कविता तरी त्याला अपवाद कशी असेल.

'शिवशक्ति'    — **शिरीष पै**
वरळी, मुंबई १८    १०-३-६७

## पूजन...

ना गंध ना रूप माझ्या गीताना
फुलांचा तयाना नसे गोडवा...
माधुर्य नाही इथें गेयतेचे
भारावलेली मनी भावना...
आंसावलेल्या व्यथेच्याच पंखी
लाभेल त्यांना जगी आसरा...
आभास सारे तयानी पहावे
हें भाग्य त्यांचे ठरावे जगीं...

दा. क. १६२७८
(स्थळ प्रत)

# छेडण्याला शक्ति दे तूं...

छेडण्याला शक्ति दे तूं
जीवनाची रुद्रवीणा...
साहण्याला धैर्य दे तूं
दुःखरंगी ती निराशा...

अर्थ दे तूं या गीताना
जीवनाचा सर्वलक्षी,
आश्रिताला दे निवारा
वाट चुकला एक पक्षी...

दुःखितांचा दीप व्हावें
आंस ही वेड्या जीवाची...
विश्व सारें तारण्याला
आस्थि देई रे दधीची...

धार दे तूं फत्तराला
कोरुनिया भाग्यलेणें,
आंसवानी ओळखावें
दुःख माझें जीव घेणें...

## ● अर्थ आहे वादळाला...

स्वप्न होते जें तपाचे
स्वप्न आता ना उरे
पंख तुटल्या या मनाचा
तोल मज ना सांवरे

ओंजळीने दुःख प्यालो
तृप्त होई ना तृषा..
अश्रु भरल्या नेत्री माझ्या
तप्त होते ग व्यथा...

अर्थ आहे वादळाला
अन् नभाला खिन्नता..
शाप आहे या व्यथेला
ही कुणाची सांगता...

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...८९४६८.. वि: ...काव्य...
क्रमांक ...१०७०९.. नों: दि: ...२३।२।९८

# तुझ्या मनाचा तिळा उघड तूं...

पहावयाची आहे मजला
लुटलेली तूं स्वप्नसंपदा,
तुझ्या मनाचा तिळा उघड तूं
माझ्यासाठी फिरून एकदा..
डोळे फिरवुन हंसून किंचित्
मिटूं नको तूं निळी पांपणी
मला वाचूं दे तुझ्या मुखावर
गतजन्माची आर्त कहाणी...
डोळे भरूनि पांहू दे मज
माझ्या केवळ स्वप्नीचें धन
नित्य तयाच्या भेटीसाठी
तिळतिळ तुटते हें वेडें मन..
मिळेल तेव्हां मिळो किनारा
रितेपणाच्या एकान्ताला,
तुझ्या मनाचा तिळा उघड तूं..
फक्त एकदा.. फक्त एकदा...

## असे एकदा व्याकुळते मन...

असे एकदा व्याकुळतें मन
कुणासाठी कधिं पुसुं नका तें,
क्षयि चंद्रासम खिरते कणकण
फुलवित असता जुनीच दुःखें...
कधीं व्यथेच्या पंखावरती
असे अचानक मोहरती क्षण,
आठवती मज गमती जमती
खेळामधली गट्टी फू...ग...
लपाछपीचा खेळ खेळता
झांकितसे मी डोळे अलगद,
कान गोष्टी कधिं करीत असता
चुंबितसे मी कुरळे कुंतल...
तुझ्या गोबऱ्या गालावरती
नकळत टिचकी हळुच मारता,
लालबुन्द होऊन म्हणालिस :
"असली कसली रे ही थट्टा"
आठवते मज असेंच कांही
मनांत नसता भलतें सलतें...
तुझ्या स्मृतीच्या गर्द धुक्यावर
जुनीच दुःखें कोरित बसणें...
असें एकदा व्याकुळतें मन,
कुणासाठी कधिं पुसुं नका तें
जीवन होते तेव्हां गंधित
निर्माल्याला आतां जपणें...

# झरते आहे अबोध कांही...

झरते आहे अबोध कांही
अणुरेणुतुन या माळावर,
हरित तृणाचे पोपट रंगी
उरते केळव शुष्क कलेवर...
उगा थबकतो उदास वारा
स्पर्शुन जाता या माळाला...
भिरभिरणाऱ्या तांबुस वाटा
कुजबुज करिती क्षणाक्षणाला...
कधीं वडाची दीर्घ जांभई
त्रिणीत बसतें अपुल्या छाया...
हंसती पानें सळसळणारी
परस्परांची पाहुन माया...
कधीं कधीं तर हळद उन्हाची
शोधित बसते तुझी पाऊलें...
संध्येचे अन् गंध केशरी
चकित पाहुनि क्षितिज लाजलें...
कुठे सांडली कुणास ठाऊक
प्रीतीची तव धुंद कस्तुरी...
त्या धुंदीच्या जाणिवेंत ना
स्फुरतें आता काव्य अंतरी...

## ● नक्षी...

या गीताना गंध असावा
तुझ्या मोकळ्या कचभाराचा,
गंधित ओल्या शब्दपाकळ्या
तिथें चुकावा भ्रमर मनाचा...

शोषुन घ्यावी या भ्रमरानें
मधु स्वप्नांची जाणीव सगळी
श्वास मोकळया धुंद हवेनें
नक्षत्रांची झुलें डहाळी...

या डहाळीवर पहुडलेला
चंद्राचा कधि चुकारपक्षी
पहात बसतो संथपणाने
एकरुप छायांची नक्षी...!

# जाळलिस तूं अलकानगरी. . . . . .

पिसापरि भिरभिरता हें मन
तव दुःखाचा मिळे निवारा...
अश्रूंचे तव दान चिरंतन
झुले सुखाचा फिकट कवडसा...!
कुन्दकळ्यांशी करतें हितगुज
तव प्रेमाची अबोध भाषा,
निश्वासाचे फुल पाखरूं
शोषून घेते तव अभिलाषा...
निळसर लहरींच्या स्पर्शानें
वेडावुन कधिं खिन्न किनारा
वाचीत बसतो वाळुवरती
मौनातील तव गूढ इषारा...!
गीत जुळविता युगायुगाचे
स्वप्न वाटले तेव्हां जीवन...
जाळलीस तूं अलकानगरी
तुझीच ओली चूड पेटवुन...!

## ● मोल

फटफटलें जधिं निळे जांभळे
क्षितिजावरती दूर धरेवर...
तेव्हां झुरले होते निश्चित
त्याच व्यथेनें धूसर अंबर...

मनास आता नित्य टोंचणी
तुला पहाता अशी अनावर...
चाहुल येते स्वप्नांना मम
किणकिणता क्षण तुझेच बिल्वर...

आलि होतिस आठवतें मज
वादळ वाऱ्याच्या पंखावर...
प्रीतीची तव साय मुलायम
ओघळली मग या ओठावर

घरंगळेना नील नभावर
पुनवेला चंद्राचे नाणें...
परंतु आता मूक मनानें
मोल तयाचे मोजित बसणें...

ग्रंथालय, ठाणे.
विः काव्य

## मी बुडताना. . .

मी बुडताना तुला बुडविले
त्याच लयीतच.. तिथें समेवर,
स्थळकाळाची भेदून छाती
सौख्य 'फुल'विले या ओठावर...

या ओठावर गूढ लिपींतच
आठवणीचे शत रामायण
गहिरे डोळे करीत बसले
स्वप्नांचे तव नित पारायण...

पारायणी मन मुग्ध होतसे
त्याच लयीतच तिथें समेवर
मातृत्वाच्या वरदानानें
थिटें जाहले दानाचे कर...!

## ● होता श्रावण फितुर...

दाट उभार शेतात
सळाळता सोनसळा
मातटलेल्या मनांत
फुले तुझा प्रीतकळा...
तुझ्या शेलाट्या बांध्यास
गच्च पदराचा खोंच,
धुंद मादक नेत्रांत
सुटे यौवनाचा झोक...
वेचुनिया रानफुलें
माळलेला कचभार
गंधगर्भ मन डोले
श्वास जहाले आतुर...
बांधावरचा तेरडा
पायाखाली चिरडुन
ताठा तोऱ्यांत आलिस
क्षितिजाशी ओठंगुन...!
गंधवती ओली माती
भारावली एक क्षण
होता श्रावण फितुर
नव्हतो आपुले आपण...!

## अथांग मनांत...

उतट मनाचा          मातट गंध
गडद सुखाचा          फिकाच रंग...

सुंदर स्वप्नांचे          निस्तेज जीवन
अमृत ओठी          विषाचे प्राशन...

मधुर भाषणीं          स्वार्थीच हेतु
भाबडेपणात          संशय सेतु...

हास्यांत दडती          रक्ताचे दूत
बेचव आठव          अथांग मनांत...

## ● निरोपाचे हांसू उधळावें...

क्षुद्र मी पामर पाप्याचे पितर
पुण्याचा आधार गवसेना......
निराशेचे माप पदरी अमाप
भ्रमंतीचा शाप जन्मोजन्मी...
पेंगली नजर क्षितिजहि दूर
ओळखीचा सूर निखळला......
दूरच्या प्रस्थानी माझा मी सांगाती
सुखाचे सोबती पांगलेले......
बुडताना तारं आवरा हो आंसू
निरोपाचे हांसू उधळावें....!

## ● शब्दांचे शब्दत्व संपलें...

शब्दांचे शब्दत्व संपले
कल्पनेस मग येई भोंवळ
भाव सुमांचा गंध निमाला
अन् प्रीतीची रितीय ओंजळ...

युगायुगांचा प्रवास अपुला
संपायाचा सांग कसा पण?
मौनाच्या गंगेत वितळले
अज्ञाताचे गूढ रितेपण...!

निश्चल आहे जीवन सागर
आठवणींचा दूर किनारा
सुख दुःखाचा हिशेब करता
खिन्न मनाला मिळो निवारा...!

## ● प्रीत तुझी...

प्रीत तुझी धुंद सदा
प्रीत तुझी धुंद!

झरझरत्या चंद्रातुन
गाळितसे अधरसुधा
पाझरते घन तमांत
तेजोमय रसगंगा...!

हेलावत लहरीतुन
मखमाली स्पर्शकळा
निळसर नित फेनातुन
उधळितसे भाव मळा...!

वायुच्या गतिकेतुन
अल्लडसी कुरळ केश
गहिऱ्या तव नयनातुन
मदनाचे नित्य भास...!

निशिगंधातुन धुंद
श्वासांचे रति प्रबंध
प्रीतीचा मोह जाल
वेड मना तेंच बंध...!

गीतातुन आळवितसे
नवतीचा मधुसुगंध
जाणिवेंत झुरते पण
मन्मनांत सुरुचें बन...!



ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र. १६२७८

## माथ्यावरती गर्द निळें नभ...

माथ्यावरती गर्द निळें नभ
पायतळीला काळी माती...
आकाशाची गोड निळाई
पिउन येते सागर भरती...

अभंग आहे क्षितिज कुसुंबी
स्वप्नपऱ्यांचे तें सुंदर घर,
तिथें धरेला चुंबायाला
किंचित् झुलतें निळसर अंबर...

आठवणींचा खिन्न किनारा
अन् माथ्यावर गर्द निळें नभ...
आळवीत मनीं आर्त जोगिया
तुडवित जाणें अनोळखा पथ...!

## विस्मरण. . .

विसरणार जर असशिल मज तूं
विसरुं नको परि पुनव चांदणें
वासंतिक उन्मेषामधुनी
आळविलेले कोकिळ गाणें...!

विसरुं नको तो पारिजात अन्
श्रावणातले हिरवें काहुर
संथजलीं विरणारी वलये
धुंद धुकें..नि..निळे दहिंवर...!

सौंदर्याने ...... मोहरलेली
विसरुं नको तूं उषा लाघवी
संध्या येता खुलवित गाली
सुखस्वप्नांची गहिरी लाली...!

विसरुं नको कधिं बोल तुझे ते
'विसरणार मी नाहि तुला रे!'
आठवणींच्या गर्दीमध्यें
विसरुन जाशिल तेंच नेमकें...!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... दि: ...

## ● तुझ्या एका अश्रूमध्यें...

तुझ्या गोड हास्यामध्यें
उभें जिणें उधळावें
स्वप्नवेड्या जाणिवेंत
सारें सारें विसरावें...

आसक्तीच्या डोहामध्यें
तुला खोल बुडवावें
पहांटेच्या चांदणीला
तुझ्या मनी हंसवावे...

यौवनाच्या सीमेवर
तुझे दान आठवावे
तुझ्या एका अश्रूमध्यें
उभें जिणें वितळावे...

## ● स्वप्न कुणाचे गहिरे...

गुलमोहर दारातील
रसरशीत फुललेला
मन्मनात आज फुले
प्रीतीचा स्वप्नकळा...

सुगंधित आंबराई
लवून कुणाला बघते
ही तांबुस पायवाट
वळणावर कां दचके...?

भावाकुल जललहरी
कंपित कां यावेळीं ?
केतकीचे बन वेडे
झुलते कां पायदळी...?

पळसाची लाल फुले
आज मला हंसली कां?
स्वप्न कुणाचे गहिरे
अंतरात फुलले कां... ?

## शब्द असावें...

शब्द असावे नाजुक कोमल
कमल दलातील बिसतंतुसम
स्वप्नसुगंधित पुष्पामधला
भाव जयांचा मृदुल मुलायम...

शब्द असावें जरा बोलके
तरल धुक्यासम मोहरणारे
अधरावरती सहजपणाने
मौनामधुनी थरथरणारे...

शब्द असावें किंचित हट्टी
परि असावा लाडिक रुसवा
अटीतटीची पण फू गट्टी
विसरुन जावी हंसता हंसता...

शब्द असावे खडीसाखरी
विरघळणारे घेता चुंबन
आठवणींच्या वेदीवरती
फक्त जळावे प्रीति इंधन...

## ● काळे मांजर...

क्षितिजावरती संध्या कलता
चाळवते मम आशा वेडी,
ढगाढगातुन शोधित फिरते
गूढ मनाची अमूर्त कोडी...!
अवकाशाच्या पोकळीतला
ओघळला चंदेरी पारा,
त्या पाऱ्यातुन नकळत फुलतें
हुरहुरणारी वेड – भावना...
तेव्हां माझ्यापुढती झुलतें
अंधाराचे काळे मांजर
चोरपाऊली मनीं दचकतें
स्वरात होऊन किंचित कातर...
किलकिल करूनि पहात बसतें
गाढ मिठीतिल गोड वेदना
थरथरणाऱ्या भीतर छाया
दवांत भिजल्या चिंब भावना...!
धुक्यातली भिरभिरती कुजबुज
तिची गूढता मनांत ठेऊन
तुझ्या स्मृतीला बिलगुन बसतें
मूक मनाचे बुजरे मांजर...!

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ...
अनुक्रम.................. दि: ..................
क्रमांक .................. नों दि

# ● उधळ मला तूं...

मुरड घाल तूं
झिलमिळणाऱ्या जललहरींना
मिटून घे तूं
सूर्यफुलासम स्वप्न पाकळ्या...
शोषुन घे तूं
मावळतीचे खिन्न चांदणें
टिपून घे तूं
भल्या पहाटे नवथर गाणें
आवर जरा तूं
भिरभिरणारे पहांट वारे
उधळ मला तूं
जग भंवतीचे विसरून सारे...

## नको पाहूं तूं वळून

माझ्या दारी फुललेली
सोनचंपकाची फुले,
त्यांच्या मत्त सुगंधात
प्रीत कुणाची दर्वळे...?

गुल्बक्षीच्या फुलाना
आहे ठाउक सगळे
सर्व समजुन उमजुन
बहाणा जुईला आठवे...

मेंदी रंगल्या नखाना
वीज स्पर्शाची जाणिव
थरथरत्या ओठांना
गोड अंधुक...आठव...

नको पाहूं तूं वळून
घाव जिव्हारी बसेल
मनी सुखावलें स्वप्न
दुःखसागरी बुडेल..!

## ● मावळतीच्या मनांत हंसतें

मावळतीच्या मनांत हंसते
शरदामधले पुनव–चांदणें,
गहन तमाच्या ओठीं फुलता
रातकिड्यांचें सुन्न तराणें...

लयीत त्यांच्या भिनून जाता
भीतीलाहि येतें भोंवळ...
पायनिसरड्या शेवाळावर
नजर हरवतो काळा कातळ...

वृद्ध वडाच्या पारंब्यावर
दडून बसतो बागुलबोवा
आज तयाच्या झोळीमध्यें
तुझिया आठवणींचा ठेवा...!

## ● अशी अभाग्याची कथा...

आहे अमाप अमोघ
तुझें आकाशाचे मन,
किती किती आठवावे
क्षुद्र मातीचा मी कण...

प्रीत तुझी जीवघेणी
मला वेदनेचे दान,
किती काळ उगाळावें
तुझ्या स्मृतीचे चंदन...

तुझ्या स्मृतीचे चंदन
मनीं खिरता खिरेना
अशी अभाग्याची कथा
कुणा सांगता संपेना....!

## ● आज निरोप घेताना. . .

आज निरोप घेताना
दाटला का तुझा गळा ?
तुझा अबोल अबोला
कसा झाला शब्द खुळा...

आज निरोप घेताना
पापणीची ओली कडा
मनीं जपल्या स्वप्नास
प्रथमच गेला तडा...!

आज निरोप घेताना
चुकल्याचा कांहीं भास
संपायचा सांग केव्हां ?
दूर दूरचा प्रवास...!

दूर दूरच्या प्रवासी
कोण माझा पाठीराखा...?
कशासाठी स्मरायच्या
भावाकुल आणाभाका...?

# ● असे लिही तूं

असे लिही तूं अंधारावर
नक्षत्रांच्या चित्र लिपीनें
पुलकित व्हावी सोन पहाटी
मानवतेची सुंदर स्वप्नें...
अशी लिही तूं सजलघनावर
शुद्ध वीजेची क्रांति–गीते
जळ मातीच्या कणाकणातुन
समृद्धीचे यावे भरतें...
असे लिही तूं इंद्रधनुवर
कोमल स्वप्निल नवथर गाणें
दाट धुक्याची धुंद सुरावट
चराचराला करील वेडे...
पिऊन घे तूं शुद्ध करानी
थरथरत्या चंद्राचे अमृत
विणुन घे तूं स्वरतंतूनी
लाटांच्या सनईचे संगीत...
अशी कोर तूं दाट धुक्यातुन
मांगल्याची स्वस्तिक चिन्हें
अज्ञाताची वाट चिरंतन
तिथे वळावी गंधपाऊलें...!

## बाधा

गस्त घालते नील नभावर
पांढुरक्या मेघाचे चेटुक
भर मध्यान्ही संथ जलावर
लहरत जाते ओढ अनामिक...
टिटवीच्या कर्कश नादानें
तडकत जाते तप्त शांतता
चाळवतें क्षण खिन्नपणाने
उदास माळाची सुखनिद्रा !..
निश्चलतेची कांच बिलोरी
चमकत आहे अणुरेणूवर
भिरभिरणारा चुकार पक्षी
चरा ओढतो तिच्या मुखावर
पेंगुळती वृक्षांची स्वप्नें
खुरट्या पिवळट शुष्क तृणावर
क्षितिजावरती टेकुन माथा
उगाच झुरती निळसर डोंगर!...
एकलकोंड्या पाणवठ्याला
झपाटलेली पिशाच बाधा
कुजबुज करते पागल पाणी
उभा न राही पिसाट वारा...

# ● विज्ञानाचा तिसरा डोळा

इथें तडकते क्षितिज मनाचें
विज्ञानाच्या ठोकरींत, अन्
कडें निखळें ब्रह्मांडाचे
अणुशक्तीचा पोलादी घण...

गतकाळाला हिणवायास्तव
शतक विसावे हंसते मिस्किल,
यंत्रयुगाच्या चक्रावरती
भरडून निघतो मानव स्वप्नील...

कवटीरक्षित मेंदु इवला
चराचरावर करतो हुकमत,
देवदुतांचा एक काफिला
विसरून जातो दैवी हिंमत...

इथेंच ठरतें क्षणभर आता
बुद्धीची परि धांव पांगळी
विज्ञानाचा तिसरा डोळा
त्यांत पहा शिवशक्ति सगळीं...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४१४६८ वि: काव्य

क्रमांक ९८८९ नोंद दि: २३।८।६८

## क्षुद्र सुईच्या अग्राने

क्षुद्र सुईच्या अग्राने
त्याने व्यापिले गगन,
सारे कळल्याचा भास
त्याचे अस्तित्व गहन...

त्याच्या मूक हुंकारात
गर्जे सागराची गाज
धुंद आषाढ सरीत
घुमे वादळी आवाज...

दाट धुक्यात दडली
त्याच्या ओळखीची खूण
चिपळ्यांच्या नादावर
फिटे भक्तीचेहि ऋण...

# ● बोलाचाच भात...

बोलाचाच भात बोलाचीच कढी
मनांतली अढी लपलेली...

शद्ब मुखीं गोड मनी परि तेढ
दु:खितांचे कढ कढलेले...

फुकाची फुंकर असा हा संसार
तयातील सार आटलेले...

जगण्याचा थाट वृथा आटापिट
भुकेल्यांचे पोट पेटलेले...

नको शद्ब सुधा पुरे घांस साधा
वैफल्याची बाधा भिनलेली...

पहा जगदीशा सामान्यांची दशा
निराशेंत आशा फुलविसी...!

## अशा जिण्याला नटवीत असता. . .

तुमच्या डोळ्यावरी असूं द्या
अखंड चष्मा व्यवहाराचा,
पानसुपारीसम चघळावा
हिशेब निव्वळ पै-पैशाचा
कारकुनांची भिस्त केवढी
दहा दहाच्या लोकलवरती,
बिलगुन जाती या गाडीला
जशी वाघुळें वट-वृक्षाची..
मुरडत जाती चंचल पोरी
नव फॅशनची नवी मांडणी,
ऑफीसच्या बेचव गप्पांना
सुखस्वप्नांची हीच फोडणी...
संसाराच्या नांवाखाली
भातुकलीचा खेळ रचावा,
टीचभर खळगी अर्धउपाशी
पक्वान्नांचा ढेकर द्यावा...
असूर्यपश्या खोलीमध्यें
सुखदु:खाचें वस्त्र विणावें,
अशा जिण्याला नटवीत असता
डोळ्यांचे पारणे फिटावें !!

# धन्य जहाले मानव कुळी...

प्रत्येकाच्या डोक्यावरती
वॉशिंग्टनची कुऱ्हाड आहे
सत्याची रूपेरी धार
जीव घेण्या टपली आहे...

जगण्याची वेडी आस
जीवनरथ ढकलित आहे
रडण्याचे फक्त बळ
हाडामध्यें उरले आहे...

क्षितिजापासून दूरवर
अनंताचा प्रवास आहे
चाकोरीचा कणखर कणा–
उखडून जीवन पिचले आहे...

वेदनेच्या वेदीवरती
सुखस्वप्नांचा देऊन बळी
किती अनामिक वीर हुतात्मे,
धन्य जहाले मानव कुळी...

## ● ऋण...

तुझिया दर्शनें वृथा यातायात
जिवाची या तात लाविसी कां ?
दुभंगला आज दगडाचा देव
भावनेचा घाव सुखावला...
ठोठावतें दार सुखाचे मरण
दुःखाचे तारण तुझ्यापाशी...
तुझिया कारणें होऊन निःसंग
जीवनाचे रंग उधळले...
घोकले लाखदा तुझे पुण्यनांव
पांगळ्याचो धांव पांगुळली...
सोसले सदैव ऐरणीचे घाव
वेदनेचे ऋण पेलवेना...

## ● तुझी चंदनाची वाट...

अंतराचा तुझ्या तळ
किती किती आहे खोल
प्रकाशाच्या पावलांची
मला पडे नित्य भूल..

कोंडलेल्या नादब्रह्मी
घुमे ॐ काराचा नाद
अवकाशाच्या पोकळीत
कोण घाली मला साद...!

तुझी चंदनाची वाट
माझा धुक्याचा प्रवास
अमृताच्या घोटासाठीं
प्राण माझे कासाविस...

## आता आले अणुयुग...

सारे ऐका हो सज्जन आता आले अणुयुग
जग चालले मुख्याने विज्ञानाच्या मागोमाग
चिरडल्या गर्दींमध्यें उभ्या जगाचे स्मरण
दुःखितांच्या डोळ्यामध्यें पाहूं आमुचेच मरण
उगाळावे किती काळ झिजलेल्या संस्कृतीला
पुराणाच्या जुन्या कथा दुवा त्यांचा तुटलेला
आता पुरे आता पुरें, सप्तस्वरांचे संगीत
रेडिओच्या कंठातले ऐकूं बिनाकाचे गीत
सीतेच्या वल्कलांचे आता पुरे पुण्यगान
झळाळतें अंगोपांगी पारदर्शी नायलॉन
शास्त्रज्ञानी निर्मियला नवा चंद्र–नवें जग
अणुशक्तीच्या काडीनें ब्रह्मांडाला लावू आग
देवकुळी जन्मलेल्या सुसंस्कृत मानवाला
लालसेनें पेटलेल्या शाप आहे दानवाचा

# ● अज्ञानाला कळले आहे...

अज्ञानाला कळले आहे
अन्यायाशी अपुले नातें
जनतेच्या हाती लखलखतें
क्रांतीचे पोलादी पातें...

पिळवटलेल्या श्रम जीवाना
मिळे न खाया अर्धी भाकर
मुठभर भोंदु पुंजीपतीना
पक्वान्नांचा सदैव ढेकर...!

चघळायाची कुठवर आता
दुष्ट रुढींची जन्म शिदोरी ..
दारिद्र्याचा शाप जिण्याला
घेऊन मिरवायाचे जगती...

परि क्रांतीच्या झंझावाती
मूळ उखडतें अन्यायाचे ..
श्रमिक जिण्याची लव्हाळपाती
फक्त, पाहती स्वप्न उद्याचें !

दा. क्र. १६२७८
(स्थळ प्रत)

## ● येऊं दे पडसाद त्याचा...

जाऊ दे न्यूनत्व माझे
व्यापु दे विश्वात्मता
वेदनांचे विष गहिरे
डंखु दे माझ्या मना...
चिरसुखाची साय आता
फुलव तूं माझ्याच गात्री...
आसवांची पुण्यगीता
वर्षु दे माझ्याच नेत्रीं...
कवळु दे अमृत हस्ते
रंजल्यांना ... गांजल्याना...
स्पर्शु दे मानव्य माझे
दुःखितांच्या यातनांना...
येऊं दे पडसाद त्याचा
गर्जु दे नभी नौबती
दूरच्या प्रस्थान काली
मीच माझा सोबती...!

REFBK-0016278
REFBK-0016278
...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४२-७६८ वि: काव्य
क्रमांक ७८८९ नों. दि. २३।८।७८